(Marathi)

1034
9/81

1347 12 P

1347

प्रभात फेरी करितां

# भरीव ठोशांचे गुद्दे.

## भाग १ ला.



IMPERIAL RECORD
RECEIVED
16 FEB. 193

सत्य विजय बुक डेपो

सुर्यमहाल नं. ८३ गिरगांव मुंबई नं. ४

किंमत आर्धा आणा.

1347
mar

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1347
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

## पद

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥ धृ० ॥

मलमल जो है विदेशी । आ । को गज मिलेगा ॥
खादी नहि त्यजोंगे ॥ लेंगे० ॥ १ ॥

बहोत्तर करोड रुपिया । परदेश जा रहा है ॥
उसकू बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥

चरखेकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
अंग्रेज को सुनाके । लेंगे० ॥ ३ ॥

या हक्क है हमारा । तन जानसेबि प्यारा ॥
मरणें नहीं डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥

हम सब परेड फौजीं । कप्तान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे० ॥ ५ ॥

तेहतीस करोड फौजी । रण साथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे । लेंगे० ॥ ६ ॥

चरखा ही तोफ बनेंगे । तकवा बने है बरची ॥
गोलेसे सूत्रके हम । लेंगे० ॥ ७ ॥

# भरीव ठोशाचे गुद्दे.

**पद** [ चाल—मला मुंबईला जायचे ]

।। कई जत्रा होईल खळबळ ।। तवाच जिरेल इंगा ।। धृ० ।।

।। गोरा सत्ता करी ।। आपणा सर्वांवरी
।। लागला घालाया धांगडधींगा ।। १ ।।

।। गोरा झाला राजा ।। उडवीतो मौजा
।। जुलमी कायद्याचा घाली हा पींगा ।। २ ।।

।। गरीब रयतेवर ।। करी शीर जोर
।। ह्यानी मायंदाळा मांडलाया दंगा ।। ३ ।।

।। अशा सरकारची ।। जुलमी ब्रिटीशाची
।। खोड मोडाया नको कां सांगा ।। ४ ।।

।। एक विचारानें ।। बहु चिकाटीनें
।। नौकरशाहीचा जिरवूं नांगा ।। ५ ।।

।। सांगे शंकर कवी ।। भिती सोडुन बावी ।।
।। द्यावा हाकलून जालीम भुंगा ।। ६ ।।

**पद** ( चाल—हे प्रभोविभो )

॥ उठा चला तयार व्हा मरणाला
नामर्द असे का बनला ॥ धृ० ॥

॥ या भ्याडपणा सोडोनी ॥
॥ दाखवा बाणा मर्दानी ॥
॥ सांगतो हात जोडोनी ॥
आठवुनी महात्माजीला ॥ उठा चला तयार व्हा
मरणाला ॥ १ ॥

॥ या भारत भूमीवरती ॥
॥ भलभलते येउनी चरती ॥
॥ शिर जोर तुम्हांवर करिती ॥
तरी स्वस्थ कसे बसला ॥ उठा चला तयार व्हा
मरणाला ॥ २ ॥

॥ कवी शंकर बारवकर ॥
॥ म्हणे उठा आतां सत्वर ॥
॥ घेउनी हातामधें शीर ॥
शत्रूस तोंड देण्याला ॥ उठा चला तयार व्हा
मरणाला ॥ ३ ॥

## पद ( चाल—थांब थांब थांब )

॥ देशामधली काढा घाण घाण घाण ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ धृ० ॥

॥ राष्ट्रघातकी जे बनले ॥ स्वत्वास ज्यांनीं छळियलें ॥
अशा दुष्टांचें उपटा कान कान कान ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ १ ॥

॥ भारतभूमीवरती ज्यांनीं ॥ आजवरी केल्या चैनी ॥
तोची अपुला घेई प्राण प्राण प्राण ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ २ ॥

॥ कवी शंकर जोडुनी हात ॥ बांधवास विनवी त्वरित ॥
राखा देशाचा तुम्हीं मान मान मान ॥ आतां ॥

देशामधली काढा घाण ॥ ३ ॥

## पद

॥ केली गोऱ्यांनीं चैन आजवरी ॥ आपल्या देशावरी ॥
सांगू कितीतरी ॥ झाले पहा मग्रुर आपणावरी ॥ १ ॥
॥ ज्यांचें खाउनी अन्न त्यावरी ॥ बनले कारभारी ॥
प्रत्येकांवरी ॥ थयथय नाचती छातीवरी ॥ २ ॥

॥ करी जुलुम रयतेवरी ॥ दडपशाही करी ॥
बडे अधिकरी ॥ बहिष्कार घालू आधी यांच्यावरी॥३॥
॥ कवी शंकर सुचना करी ॥ ब्रिटीशांच्या उरी ॥
बसा खरोखरी ॥ हिंदुस्थाना बाहेर लावा सत्वरी ॥४॥

## पद [ सुखाचा शोध ]

सतीची लाज राखाया ॥ नको का खादीमय काया ॥धृ०॥
बांगड्या वान हे सतिचें ॥ स्वदेशी वापरायाचें ॥
विनंति आपुल्या पाया ॥ नको का खादीमय काया ॥ १॥
विदेशी माल हा जाळा ॥ आज्ञा गांधिची पाळा ॥
गुलामी पाश तोडाया ॥ नको कां खादीमय काया ॥ २ ॥
आपुले दैन्य जाण्याला ॥ सुखाचें दिवस पाहण्याला ॥
शत्रुचा नांगा जिरवाया ॥ नको कां खादीमय काया ॥३॥
॥ विनंती शंकर कविची ॥ सांभाळा अब्रु देशाची ॥
शत्रुची खोड मोडाया ॥ नको कां खादीमय काया ॥ ४ ॥

## पद [ चाल—आनंद कंद ]

॥ कसला समेट करितां ॥ कळूंद्या आम्हांस आतां ॥धृ०॥
येरवडा मंदिरांत
काय झालें नाही कळत
वाट पहात आहे जनता ॥ कळुद्या आम्हांस आतां ॥ १ ॥

सभेटात काय झालें

कोणी काय मान्य केलें ॥

जी काय झाली वार्ता ॥ कळुद्या आम्हांस आतां ॥ २ ॥

झाली मिटींग समाप्त ॥

मग ठेविली कां गुप्त ॥

का काळजींत पडता ॥ कळुद्या आम्हांस आतां ॥ ३ ॥

शंकरराव कार्येचें ॥

आहे सांगणे हिताचे ॥

तुम्हीं हक्क काय देता ॥ कळुद्या आम्हांस आता ॥ ४ ॥

## पद ( चाल–आनंद कंद )

टकली फिरून फिरवूं । घेऊं स्वराज्य घेऊं ॥ धृ० ॥

बनिया विलायतेचा ॥

यानें नाश केला आमुचा ॥

हाकलून ह्यांस देऊं ॥ घेऊं स्वराज्य घेऊं ॥ १ ॥

खादीच वापरून ॥

संघशक्ती वाढवून ॥

मर्दानी बाणा दाऊं ॥ घेऊं स्वराज्य घेऊं ॥ २ ॥

व्यसनास देऊं फाटा ॥

मोडूं सैतानांचा ताठा ॥
देशास्तव प्राण देउं ॥ घेउं स्वराज्य घेउं ॥ ३ ॥
शंकरराव कविचें ॥
हे सांगणें अखेरचे ॥
आले तसेंच लावूं ॥ घेऊं स्वराज्य घेऊं ।। ४ ॥

**पद** [ चाल हरहर महादेव बोला ]

सत्याग्रह करण्याला ॥ व्हा हो तयार मरण्याला ॥ धृ० ॥
या वाचुनि हो सद्गति नाहीं आतां आपणाला ॥
विजंई होऊं अथवा जाऊं लढून स्वर्गाला ॥ १ ॥
कंबर बांधा उठा चला हो रण संग्रामाला ॥
पुरे जाहली झोप आतां ती काळ कठिण आला ॥ २ ॥
गनिमा हातुनी करूं मोकळे भारत भूमीला ॥
यास्तव मागें हटूं नका हो प्राणही देण्याला ॥ ३ ॥
परदेशांतुनी जे या ठायीं आले चरण्याला ॥
त्यानां आपण शस्त्र न घेतां जाउं चिरण्याला ॥ ४ ॥
बनिया म्हणुनी सुवर्णभूमी आला लुटण्याला ॥
तरी बंधुनो चला तयाची खोड मोडण्याला ॥ ॥५ ॥

पूर्वज आपुले कधींच नाहीं भ्याले मरणाला ॥
तुम्हींच कां मग भितां सांगा गोळीबाराला ॥ ६ ॥
नका बंधुनो भिऊं तुरुंगामध्यें जाण्याला ॥
शंकर कवि म्हणे श्रीकृष्णाचा जन्मच तेथें झाला ॥ ७ ॥

**पद** ( चाल—पोवाडयाची )

पारतंत्र्य या भारत भूमिला स्वतंत्र करण्याला ॥
देशोद्धारक वीर महात्मा गांधी अवतरला ॥ १ ॥
परसत्तेच्या भूतभीतिची कराया होळी ॥
देत असे हो वीर महात्मा गांधी आरोळी ॥ २ ॥
तद्वत लाला लजपतराय हा देशाचा लाल ॥
स्वराज्यास्तव देउनी गेला प्राणाचे मोल ॥ ३ ॥
पंडित मोतिलाल नेहरू बजाज श्रीमंत ॥
झटती देशासाठीं जनहो पहा सदोदित ॥ ४ ॥
मोतिलाल नेहरूचे चिरंजीव जवाहीरलाल ॥
गेले कारागृही करोनी शत्रुवर चाल ॥ ५ ॥
पटेल बंधू वीर नरीमन तसेंच तय्यबजी ॥
जगदोद्धारासाठी झटती विर हे रणगाजी ॥ ६ ॥
गांधी नेहरू लढले रणांगणीं स्वातंत्र्यासाठीं ॥
लढतां लढतां केलि शत्रुने त्यांना अडकाठी ॥ ७ ॥

देवि सरोजिनी कमलादेवी चट्टोपाध्याय ॥
कस्तुरबाई लिलावतीचें पूजावेत पाय ॥ ८ ॥
धन्य धन्य या माता आपुल्या आहेत हो साऱ्या ॥
पुरुषां आधीं धैर्यवान या अरीस जिंकणाऱ्या ॥ ९ ॥
किती बंधुनो गाऊं मी या अबलांचे गूण ॥
केली त्यांनीं तुह्मांवरती पहा कशी ताण ॥ १० ॥
तरी बंधुनो कशी तुम्हांला ॥ गाढ झोंप आली ॥
उठा चला हो काय पाहतां दीन भूमी झाली ॥ ११ ॥
शांतीमय रग संग्रामाला झाली सुरवात ॥
तरी चला हो राष्ट्रीय झेंडा घेउनी हातांत ॥ १२ ॥
जे वीर आपणासाठीं गेले तुरुंगवासांत ॥
चला सोडवू आपण त्यांना उठा उठा त्वरित ॥ १३ ॥
साखर झोंपा पुरे जाहल्या तुमच्या त्या आतां ॥
जागे व्हा हो आतां तरी या स्वातंत्र्याकरितां ॥ १४ ॥
स्वदेशाची चाड खरोखर असेल हो ज्याला ॥
शंकर कवि ह्मणे तोची होईल तयार मरण्याला ॥ १५ ॥

**समाप्त.**

## पद

### पद [ चाल—दुखाचा शोध ]

महात्मा वीर गांधिचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
उठा व्हा सावध आतां । किती हो झोप तुम्ही घेतां ॥
नव्हे हा काळ झोपण्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
पुरे ती जाहली झोप । घराची जाहली खोप ॥
आठवा बाणा पुर्वजांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
बंधुनो बांधा कंबर । चला घ्या हातामध्यें शिर ॥
कराया मोड शत्रुचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
देऊं नका शेत सारा । आणि त्या अवघा । ॥
असे हा मार्ग विजयाचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
आपुल्या संघशक्तीनें । आणि ईशकृपेनें ॥
करूं या नाश गनीमांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
असे ही वेळ शांतीची । नाहीं क्रांती करण्याची ॥
लढा हा बिन शस्त्राचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
सदा सत्य बोलावें । शत्रुशीं शांत वागावें ॥
करावा त्याग असत्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
मर्दानी बाणा आंगात । यावया करा मेहनत ॥
शिका तो खेळ लाठीचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
गिरवा कित्ता पुढाऱ्यांचा । त्यांच्या स्वार्थत्यागाचा ॥
तुम्हाला अर्ज हा प्रेमाचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥

# विक्रीस तयार.

प्रभात-फेरी, नगर-फेरी, सायंफेरी, दारु, परदेशी कापड व रेस पिकेटींग, महात्मा गांधी, नाना फरारी, सोलापुर, सिंहगड, पोवाडा, प्रभात-संचार. तरुण भारत गितांजली, वगैरे सर्व प्रकारची स्वदेशी उपदेशपर पुस्तकें माफक दरानें मिळतील. क्याटलाग मागवा व्यापाऱ्यास भरपूर कामिशन मिळेल.

## पी. बी. पाठक आणि कंपनी,

महात्मा एजन्सी, सुर्यमहाल गिरगांव रेल्वे तिकीट व पार्सल ऑफीसचे वर मुंबई नंबर ४

---

प्रकाशकः—वासुदेव विनायक दातार मुंबई ४

प्रिंटर:--पी. बी. पाठक श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुं. ४